




जनसामान्यांचे शस्त्र,दैनिक — बीड, छ.संभाजीनगर, जालना, नांदेड, परभणी, लातूर, धाराशिव

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ● अंक १६८ ●गुरूवार दि.२६ सप्टेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955



# अखेर 9 दिवसांनी जरांगे पाटलांनी उपोषण सोडले

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना दिला इशारा

जालना । प्रतिनिधी
मराठा समाजासाठी उपोषण आंदोलन करणारे मनोज जरांगे यांनी त्यांचं उपोषण स्थगित केलं आहे. मनोज जरांगे मागच्या नऊ दिवसांपासून उपोषणाला बसले होते. आज त्यांनी उपोषण स्थगित केलं असल्याची घोषणा केली आहे. देवेंद्र फडणवीस तुम्हाला सांगतो की मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातला कुणबी मराठा एकच आहे. समाज एक झाला हे चांगलं झालं आहे. मराठा आणि ओबीसी एकच आहेत. आपल्या आरक्षणाची लढाई पुढे चालली आहे. आपण कुठल्याही नेत्याला भ्यायचं नाही हे लक्षात घ्या. आमच्या लेकरांशी, लेकींशी बेइमानी करु नका. तसंच तुम्हाला सांगतो एकाही नेत्याच्या सभेला, प्रचाराला जायचं नाही, असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे.







### ज्यांनी त्रास दिला त्यांचा शेवट मराठेच करणार

खुशाल घरी झोपून राहायचं, लाडकी बहीण योजनेचे पैसे नाही दिले तरी चालतील कुणीही प्रचाराला जायचं नाही. राजकीय नेत्यांनी दबाव आणला तर एकमेकांना साथ द्या. त्यापेक्षा जास्त त्रास दिला तर व्यासपीठावर गर्दी आणि मतदानाला कुणीच नाही हे लोकसभेला झालं आहे तसंच आत्ताही करा असंही मनोज जरांगे म्हणाले. मनोज जरांगेंनी उपोषण स्थगित झाल्याची घोषणा करताच एक मराठा लाख मराठाच्या घोषणा करण्यात आल्या. मराठा आरक्षणासाठीची जोरदार घोषणाबाजी यावेळी करण्यात आली. मराठा समाजाने मला खूप आग्रह केला. त्यांनी उपोषण करायचं नाही असं सांगितलं. ज्यांनी ज्यांनी मराठ्यांना त्रास दिला त्यांचा शेवट मराठेच करणार आहेत. मी आज ४ किंवा ५ वाजता उपोषण सोडणार असल्याचं मनोज जरांगेंनी जाहीर केलं.

# परळीत पंकजा मुंडेंना मोठा धक्का!

## विश्वासू शिलेदार शरद पवारांच्या ताफ्यात,विधानसभेचं गणित बदलणार?



परळी । प्रतिनिधी
विधानसभा निवडणुकीला अजून बराच अवधी आहे, पण नेत्यांचे पक्ष बदलण्याची प्रक्रिया सुरूच आहे. आणखी एका नेत्याने पक्ष बदलला आहे. या पक्षांतरामुळे भारतीय जनता पक्ष आणि पंकजा मुंडे यांना मोठा धक्का बसला आहे. पंकजा यांचे दीर्घकाळचे विश्वासू मानले जाणारे राजाभाऊ फड यांनी बुधवारी पक्षाचे नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत भाजपला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटात प्रवेश केला आहे. राजाभाऊंचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये समावेश झाल्यानंतर पक्षप्रमुख शरद पवार यांनीही सत्ताधारी भाजप आणि शिवसेना यांच्याशी हातमिळवणी करणाऱ्या राष्ट्रवादीच्या नेत्यांवर अप्रत्यक्ष हल्ला चढवला. ते म्हणाले की, राजाभाऊ फड हे गेली २५ वर्षे परळीचे सरपंच असून राष्ट्रीय समाज पक्षाचे माजी युवा अध्यक्षही आहेत. आता पंकजा मुंडे यांच्याकडून परळीची जागा हिसकावून घेण्याच्या आमच्या पक्षाच्या रणनीतीत ते महत्त्वाची भूमिका बजावण्यास तयार आहेत. शरद पवार म्हणाले, पंतप्रधान '४०० पार करा'चा नारा देत राहिले, पण लोकसभा निवडणुकीनंतर त्यांना २४० जागाही गाठता आल्या नाहीत. आमच्या नावावर निवडणुका जिंकून सरकार स्थापन करणारे लोक आम्हाला सोडून गेले. पण आता इथले सरकार बदलेपर्यंत आम्ही स्वस्थ ▶▶ पान २ वर

### परळीचा आमदार आपलाच असेल-खा.बजरंग सोनवणे

बीडच्या जनतेने लोकसभा निवडणूकीत इतिहास घडविला. त्यामुळे माझ्यासारखा सामान्य माणूस खासदार झाला. अगदी त्याचप्रमाणे येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीतही परळी मतदार संघात त्याची पुनरावृत्ती घडवून आणायची आहे.त्यासाठी राजाभाऊ फड आणि पक्षप्रवेश केलेल्या असंख्य कार्यकर्त्यांना सोबत घेवून हा बदल निश्चित घडवून येईल.परळीचे राजकारण आज घडीला दबाव तंत्राचे आहे.त्यामुळे जनताही या दबाव तंत्राला कंटाळली आहे.परळी मतदार संघातील कार्यकर्त्यांचा आजचा हा पक्षप्रवेश सोहळा उद्याच्या विधानसभा निवडणुकीत पोषक ठरणार आहे. यावेळी खा. बजरंग सोनवणे असेही म्हणाले की, ▶▶ पान २ वर

### यांनी केला जाहीर प्रवेश

परळी मतदार संघातील राजकीय वलय असलेले राजाभाऊ फड यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात जाहीर प्रवेश केला. त्यामध्ये भाजपाच्या बीड जिल्हा सरचिटणीस मंगलताई सोळंके, भाजप माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद किरवले, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संघटक डॉ.जान शेख, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उद्योजक विक्रम देशमुख,भाजपच्या नागापूरच्या माजी सरपंच अश्विनी सोळंके, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पद्माकर लहाने, माजी सरपंच कुसुमताई शिंदे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी सरपंच सतीश फुंडकर, माजी उपसरपंच दत्तात्रय कदम यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला आहे.

# आमदारांच्या टक्केवारीमुळेच दर्जाहीन कामे; जालना रोड गेला पाण्याखाली

## डॉ.योगेश क्षीरसागरांचा आरोप





बीड । प्रतिनिधी
गत पाच वर्षांच्या कार्यकाळात बीडच्या आमदारांना एक काम धड करता आले नाही. जे केले त्या कामांमध्ये ठेकेदारांकडून वाट्टेल तितकी टक्केवारी घेतल्याने कामे दर्जाहीन झाली. याचा उत्तम नमुना म्हणून जालना रोडच्या कामाकडे पाहता येईल. एका पावसात शहरातील हा रस्ता पाण्याखाली जात असून नागरिकांना होत असलेल्या त्रासाला बीडचे आमदारच सर्वस्वी जबाबदार आहेत, असा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केला आहे. पत्रकात पुढे म्हटले आहे की, बीड शहरातून जाणार्या जालना रोडवरील जनता गॅरेजपासून साई पॅलेसपर्यंत करण्यात आलेला रस्ता अतिशय निकृष्ट दर्जाचा झालेला आहे. हे काम आमदारांनी श्रेय लाटण्यासाठी हस्तक्षेप करून ▶▶ पान २ वर

### नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी

बीड शहरातील जनता गॅरेजपासून साई पॅलेसपर्यंत दुकानांमध्ये पाणी शिरले आहे. त्यामुळे अनेक व्यवसायिकांचे नुकसान झाले आहेत. यानुकसानीचे पंचनमाने करून प्रशासनाने आर्थिक मदत द्यावी अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे.

# बीडमध्ये हवाला रॅकेटला एसपींचा दणका

बीड । प्रतिनिधी
बीड शहरात सुरु असलेल्या हवाला रॅकेटला बुधवारी पोलीस अधीक्षकांनी मोठा दणका दिला.बीड ग्रामीण आणि बीड शहरच्या पोलिसांनी संयुक्तरित्या कारवाई करीत बीड शहरात तीन ठिकाणी छापे मारले असून हवालाची लाखो रुपयांची रोकड जप्त केली आहे.त्यासोबतच हवाला रॅकेटसाठी वापरले जाणारे यंत्रे, मोबाईल देखील जप्त करण्यात आली आहेत. बीड जिल्ह्यात सुरु असलेल्या अवैध धंद्यांना सध्या पोलिसांनी लक्ष केले आहे. बीड शहरात हवाला रॅकेट कार्यरत




असल्याचे लक्षात आल्यानंतर पोलीस अधीक्षकांच्या आदेशावरून बीड ग्रामीण आणि बीड शहर पोलिसांनी बुधवारी सायंकाळी संयुक्त कारवाई केली. बीड शहराच्या कबाडगल्ली,डीपी रोडवरील धूत हॉस्पिटलजवळ आणि आणखी एकाठिकाणी पोलिसांनी कारवाई केली.यात तिन्ही ठिकाणाहून लाखो रुपये जप्त करण्यात आले आहेत. बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे बाळराजे दराडे, बीड शहरचे एपीआय राठोड,सिरसाट,मनोज परजणे,अश्फाक सय्यद यांनी ही कारवाई केली आहे.आणखी देखील पोलिसांची कारवाई सुरूच असून निश्चित रक्कमेची मोजदाद सुरु आहे.नूतन पोलीस अधीक्षकांनी केलेल्या या कारवाईने अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

# मोबाईलवर पिस्तुलाचे स्टेटस ठेवल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

बीड । प्रतिनिधी
दि. १३/०३/ २०२१ रोजी आरोपी शेख शारुख शेख दाऊद, फैजान रफिक बागवान, सोहेल बागवान व चौधरी कामेल रा. बीड यांनी शाहरुखच्या मोबाईलच्या इंस्टाग्रामवर हातात पिस्तुल घेऊन तसे मोबाईलवर स्टेट्स ठेवून समाजात दशहत निर्माण केली तसा व्हिडिओ सर्वत्र व्हायरल झाला होता. त्यावरुन पोलीस नाईक सोनवणे यांच्या मोबाईलवर देखील तो व्हिडिओ आला होता. त्यावरुन सोनवणे यांनी पोलीस स्टेशन बीड शहरला आरोपी शेख शारुख शेख दाऊद, फैजान रफिक बागवान, सोहेल बागवान व चौधरी कामेल रा. बीड यांच्या विरुध्द तक्रार दाखल केली होती. त्यावरुन बीड शहर पोलीस स्टेशनला आरोपी विरुध्द गुन्हा रजि. नं. ७१ / २०२१ कलम ५०५ (१ व ब), २०१ भा.द.वि.प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. त्या प्रकरणाची सुनावणी मा. मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात केस क्र.३९७/२०२१ मध्ये सुनावणी होऊन मा. कोर्टाने सर्व आरोपीची सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तात केली. सरकार पक्षाने आरोपीने हातात पौस्तुल घेऊन तसा व्हिडिओ प्रसारीत करुन समाजात दशहत निर्माण केल्या बाबतचा आरोप सिध्द करु शकले नाही. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. सय्यद जोहेब आरोपीच्या वतीने ॲड. अजहर अली यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. अजहर अली, शेख वसीम यांनी सहकार्य केले.

# भाजप ॲक्टिव्ह मोडवर!



कोल्हापूर । वृत्तसेवा
लोकसभा निवडणुकीत महायुतीची पीछेहाट झाल्यानंतर आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजप आता ॲक्टिव्ह मोड मध्ये आली आहे. महाराष्ट्रात केंद्रीय मंत्र्यांचे दौरे वाढले असून आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यादरम्यान विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर या पाच जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेणार आहेत. महाराष्ट्रात आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कोल्हापुरातील कसबा बावडा येथील महासैनिक दरबार हॉल येथे पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख कार्यकर्त्यांना अमित शहा मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी त्यांच्यासोबत केंद्रीय पर्यावरणमंत्री भुपेंद्र बघेल, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. मेळाव्यानंतर राज्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठकही घेतली जाणार आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आज सकाळपासून कोल्हापुरात व्हीआयपी मुव्हमेंट वाढली असून कोल्हापूर भाजपकडून मेळाव्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. या संपूर्ण तयारीचा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील आणि खासदार धनंजय महाडिक यांनी पाहणी केली असून यावेळी त्यांच्यासोबत जिल्हाध्यक्ष विजय जाधव, राहुल चिकोडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. अमित शहा यांचं आज सायंकाळी पाच वाजता कोल्हापूर विमानतळावर ▶▶ पान २ वर

# बीडच्या मोंढा रोडसह शहरातील अनेक रस्ता कामांना आठवडाभरात प्रत्यक्ष होणार सुरुवात

## पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून निधी;अमर नाईकवाडे यांनी मानले आभार



बीड । प्रतिनिधी
बीड शहराच्या दोन महत्वाच्या भागांना जोडणार्या जालना रोड ते अमरधाम स्मशानभूमी (मोंढा रोड) या सिंमेट रस्ता कामाला मंजुरी मिळाली आहे. महत्वाचे म्हणजे सध्या या रस्ता कामाची टेंडर प्रक्रिया सुरु असून या आठवड्यात कार्यारंभ आदेश निर्गमित होतील. सध्या सुरू असलेला पाऊस कमी होताच राज्याचे कृषी मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजयजी मुंडे यांच्या हस्ते येत्या आठ ते दहा दिवसात या रस्ता कामांना प्रत्यक्षात सुरुवात होणार आहे अशी माहिती नगरसेवक अमर नाईकवाडे व गटनेते फारुख पटेल यांनी दिली आहे. दरम्यान या रस्त्यामुळे शहरातील अत्यंत महत्त्वाच्या आणि रहदारीच्या भागाला चांगल्या सुविधा मिळणार असून वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे अमर नाईकवाडे व फारुख पटेल यांनी म्हटले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून २०२४-२५ अंतर्गत शिवशारदा बिल्डिंग (जालना रोड) ते अमरधाम स्मशानभूमी (मोंढा रोड) पर्यंतचा रस्ता तसेच हा दुभाजकासह सिमेंट कॉंक्रेटचा करण्यात यावा अशी आग्रही मागणी नगरसेवक अमर नाईकवाडे व फारुख पटेल यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजयजी मुंडे यांच्याकडे केली होती. त्यांच्या या मागणीची ▶▶ पान २ वर

# बुल्स इन चायना शॉप्स!

तक्रारदाराने आरोपीस शिक्षा करण्याचा अधिकार स्वत:कडे घेणे आणि आवश्यक त्या किमान प्रक्रिया डावलून अशी 'शिक्षा' करणे म्हणजे एन्काउंटर. जे बदलापूरबाबत घडले. या अशा शिक्षा करण्याच्या अधिकाराचे राष्ट्रव्यापी, राष्ट्रवादी प्रारूप म्हणजे इस्त्रायल आणि या 'शिक्षेचा' ताजा आविष्कार म्हणजे त्या देशाने लेबनॉनवर लादलेले युद्ध. या दोन्हींमागील मानसिकता तीच. हे सत्य बदलापूरप्रकरणी स्वीकारणे काहींस जड जाईल. पण ती त्यांच्या असंस्कारित बुद्धीची मर्यादा असेल. या प्रकरणी पोलिसांस स्वसंरक्षणार्थ गोळीबार करावा लागला, असे सांगितले जाते. तो विनोदाचा अतिशयोक्ती अलंकार. त्यावर केवळ विचारशून्यांचाच विश्वास बसेल. या आरोपीने पोलिसांवर त्यांच्याच बंदुकीतून हल्ल्याचा प्रयत्न केला, हा दावा. तो किती हास्यास्पद आहे हे लक्षात घेण्यासाठी सदर परिस्थिती पाहा. पोलीस आणि हा आरोपी हे मोटारीत होते, अशात पोलिसांची बंदूक (की रिव्हॉल्वर/पिस्तूल) ओढून घेण्यासाठी आवश्यक ती जागा त्यास कशी मिळाली? हे शस्त्र ओढत असताना पोलीस हे ओढणे काय पाहत होते का? समजा त्याने खरोखरच ते ओढले हे मान्य केले तरी त्यातून गोळी मारण्यासाठी काही प्रयत्न करावे लागतात, ते 'अनलॉक' करणे, मग विशिष्ट पद्धतीने धरणे इत्यादी सर्व तंत्र शालेय शिपाई आरोपीस माहीत होते असा सरकारच्या म्हणण्याचा अर्थ आणि त्यावर जनसामान्यांनी विश्वास ठेवावा असा त्यांचा आग्रह. ठेवणारे ठेवोत. या प्रकरणी आरोपीबाबत एका पैचीही सहानुभूती बाळगावी अशी परिस्थिती नाही हे मान्य. पण म्हणून 'असा न्याय' करण्याचा अधिकार सरकारला आहे, हे कसे मान्य करणार? हे; या एन्काउंटरच्या सुवार्तेने आनंदित होऊन पेढे वाटणाऱ्यांस मान्य असेल तर यांच्यातील काहींचे आर्थिक गैरव्यवहार, जमीन बळकावप्रकरणीही 'असाच' न्याय होणे त्यांस मान्य असेल काय? यात एक गुन्हेगार गेला याचे दु:ख नाही. तर त्यास 'घालवण्याची' पद्धत बिनगुन्हेगारी होती असे म्हणता येत नाही आणि अशा संशयास्पद मार्गाचा अवलंब करणारे सरकारच आहे हे अधिक वेदनादायक आहे. या घटनेचे स्वागत होत असेल तर सुसंस्कारित समाजनिर्मितीच्या पहिल्याच पायरीवरचा आपला मुक्काम किती लांबतो आहे, हा प्रश्न. या 'एन्काउंटरी' मानसिकतेचा आंतरराष्ट्रीय सांधा इस्त्रायलच्या ताज्या हल्ल्याशी सहज जोडता येईल. इस्त्रायलने लेबनॉनवर केलेल्या ताज्या हल्ल्यात आतापर्यंत साधारण ५०० जण ठार झाले. इस्त्रायलचे लेबनॉनशी कोणतेही युद्ध नाही. परंतु हेजबोल्ला या इराण-समर्थक दहशतवाद्यांनी लेबनॉनमध्ये आश्रय घेतला हा इस्त्रायलचा दावा. तेव्हा हेजबोल्लाच्या दहशतवाद्यांना आसरा देणाऱ्यांना शिक्षा देण्यासाठी म्हणून आपण लेबनॉनवर हल्ला करत असल्याचा त्या देशाचा खुलासा. या हल्ल्यात जे मेले त्यात बहुतांश हे लेबनीज नागरिक आहेत. ते हेजबोल्लाचे आश्रयदाते होते किंवा काय याचा कोणताही




पुरावा इस्त्रायलकडे नाही. तथापि असा काही पुरावा इस्त्रायलकडे नाही, हे आश्चर्य नाही. तर आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी अशा काही पुराव्याची आपणास गरज आहे असे त्या देशास वाटतही नाही हे २१ व्या शतकातील आश्चर्य आहे. इतकेच नव्हे तर अनेक लेबनीज घरांत विमानवेधी तोफा, क्षेपणास्त्र डागणारी यंत्रणा तैनात करण्यात आलेली आहे, असेही इस्त्रायल म्हणते. याचा बीमोड करण्यासाठी केलेल्या हल्ल्यात किती ठिकाणी अशी यंत्रणा खरोखरच होती किंवा काय याचा तपशील उपलब्ध नाही. गत सप्ताहात इस्त्रायलने त्या देशात पेजर आणि वॉकीटॉकीचे स्फोट घडवून वीस-पंचविसांचे प्राण घेतले. हेजबोल्लाच्या सदस्यांकडे हे पेजर होते आणि त्यांचा स्फोट घडवून आणला गेला, असे त्या देशाचे म्हणणे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील साधा संकेत असा की सामान्यांच्या दैनंदिन वापराच्या वस्तूंचे रूपांतर शस्त्रास्त्रांत करू नये. याचे कारण जनसामान्यांचे जगणे त्यातून अवघड होते. इस्त्रायलला या अशा संकेतपालनाची कोणतीही गरज वाटत नाही. दुसरे असे की या अशा प्रकारच्या कृत्यांतून ज्यांचा या सगळ्यांशी काहीही संबंध नाही त्यांचेही हकनाक प्राण जातात. म्हणजे या प्रकरणी कथित हेजबोल्ला समर्थकाच्या हातातील संपर्क यंत्रणेचा स्फोट घडवून त्याचा काटा काढला जात असताना रस्त्यावरील वा त्याच्या शेजारील सहप्रवाशाचाही जीव जातो. पण हे असे विनाकारण जीव घेणे वाईट यावर इस्त्रायलचा विश्वास नसावा. अन्यथा गेल्या ऑक्टोबरात हमासने इस्त्रायलवर जो ११०० जणांचा बळी घेणारा हल्ला केला, त्याचे प्रत्युत्तर देताना जे ४८ हजार बळी गेले, त्यानंतर तरी शस्त्रसंधी करावा असे इस्त्रायलला वाटले असते. पण इस्त्रायलची युद्धपिपासा कमी होताना दिसत नाही. हमासच्या दहशतवाद्यांचा 'शोध' घेताना इस्त्रायली हल्ल्यात रुग्णालये वाचली नाहीत, संयुक्त राष्ट्रांनी उभारलेली मदत केंद्रे वाचली नाहीत की लहान मुलांच्या शाळा वाचल्या नाहीत. या इस्त्रायली प्रतिशोधात प्राण गमावलेल्यांत बहुतांश महिला आणि बालके आहेत. ही हजारो बालकेही दहशतवादी वा दहशतवाद्यांची समर्थक आहेत असाही इस्त्रायलचा दावा असू शकतो. युद्धखोरी समर्थनार्थ कारणे देण्याची इस्त्रायलची क्षमता अविश्वसनीय आणि अचाट आहे. त्याबाबत संशय नाही. तो आहे इस्त्रायलचे आंधळे समर्थन करणाऱ्या अमेरिकेवर. या देशाने नुसते डोळे जरी वटारले तरी इस्त्रायलला त्याची दखल घ्यावी लागेल इतका तो देश अमेरिकेवर अवलंबून आहे. पण सद्या:स्थितीत अमेरिकेचे अध्यक्ष बुळचट बायडेनबाबांकडून ही अपेक्षा करण्यात अर्थ नाही. एक तर बायडेनबाबांची स्मृतिशक्ती त्यांच्यापासून काडीमोड घेण्याच्या तयारीत आहे. दोन दिवसांपूर्वी त्यांना आपल्याशेजारी उभे असलेले जीवश्च मित्र नरेंद्र मोदी यांचेच नाव आठवेना. वयपरत्वे येणाऱ्या विकारांनी बाधित हे बायडेनबाबा लवकरात लवकर घरी गेलेले बरे असे खुद्द अमेरिकनांसही झाले असेल. त्यामुळे त्यांच्या हातून- तेही निवडणुकांच्या तोंडावर- इस्त्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांस वेसण घालण्याचे शौर्यकृत्य घडण्याची शक्यता नाही. नोव्हेंबरात होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकांमुळे हा काळ अमेरिकेत एक प्रकारे निर्नायकीच. खेरीज निवडणुकीत यहुदींचा पैसा आणि त्यांची मते यांचीही गरज आहेच. तेव्हा त्याचमुळे नेतान्याहू यांचा चौखूर उधळलेला युद्धवारू रोखला जाण्याची शक्यता सध्या तरी धूसरच. आणि हे युद्ध थांबणे हे नेतान्याहू यांनाही तसे गैरसोयीचे. देश कोणताही असो. तो युद्धजन्य परिस्थिती अनुभवत असतो तेव्हा त्या देशातील नागरिक सत्ताधीशांमागे ठामपणे उभे राहतात. या काळात या सत्ताधीशांच्या बऱ्यावाईट कृत्यांचा हिशेब विचारला जात नाही. नेतान्याहू यांच्या खात्यात असा हिशेब द्यावा लागेल अशा कृत्यांची तर रेलचेल आहे. स्वत:च्या भ्रष्टाचारापासून ते सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार कमी करण्याच्या प्रयत्नांपर्यंत अनेक मुद्द्यांवर त्या देशातील जनता पंतप्रधान नेतान्याहू यांच्यावर नाराज आहे. विविध समयी प्रचंड निदर्शनांतून हे सत्य उघडही झाले आहे. अशा वेळी या सत्यास सामोरे जावे लागू नये यासाठी नेतान्याहू यांस उपलब्ध असलेल्या उपायांतील सर्वात प्रभावी उपाय म्हणजे युद्ध. ते सुरूच राहील हे पाहणे नेतान्याहू यांच्यासाठी अगत्याचे आहे. पण त्यांना आणि त्यांच्यासारख्यांना रोखणारे कोणी नसावे, ही खरी सध्याची समस्या. इंग्रजीत 'बुल्स इन चायना शॉप्स' असा एक वाक्प्रचार आहे. म्हणजे चिनीमातीच्या भांड्यांच्या दुकानात बेफाम बैलाचे घुसणे. सद्या:स्थितीत असे अनेक बैल अनेक दुकानांत घुसलेले दिसतात. अशा वेळी हा विनाश पाहण्याखेरीज पर्याय तरी काय?

## संस्थेतील प्राध्यापकांचा विद्यार्थ्यांशी सुसंवाद निर्माण व्हावा-डॉ.राहुल खडके

### आदित्य पॉलीटेक्निकमध्ये विद्यार्थ्यांचा कार्यपरिचय उपक्रम

बीड । प्रतिनिधी

संस्थेतील प्राध्यापकांचा विद्यार्थ्यांशी सुसंवाद निर्माण होणे गरजेचे आहे. त्यांना शैक्षणिक वातावरणाशी जुळवून घेता यावे व तंत्रनिकेतनाचे शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल या साठीच संस्था सदैव प्रयत्नशील असते. संस्था तसेच महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आदित्य शिक्षण संस्थेत नेहमीच विविध उपक्रम राबवले जातात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होतो. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.राहुल खडके यांनी केले. शहरातील आदियत्य शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरता आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाष सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. अदिती सारडा,संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य पॉलीटेक्निक मध्ये प्रथम वर्षीय विद्यार्थ्यांसाठी कार्यपरिचय उपक्रम व विद्यार्थी ,पालक स्वागत मेळावा मेळावा अयोजित करण्यात




आला होता. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.राहुल खडके बोलत होते. कार्यपरिचय उपक्रमात एआयसीटीई, तंत्रशिक्षण संचालनालय, एमएसबीटीई, तंत्रनिकेतन संस्था, आदित्य एज्युकेशन ग्रुप या संस्थेतील सोयीसुविधा, अभियांत्रिकीच्या विविध शाखा, त्यांचे परस्परांशी असलेले संबंध, व्यक्तिमत्त्व विकास, संगणकीय सुविधा, त्यांचे महत्त्व, विविध अभ्यासक्रम, पदविका अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतरच्या करिअर संधी, अशा अनेक विषयांवर प्रथम वर्षीय प्राध्यापक प्राध्यापिका यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल खडके उपस्थित होते. विभागप्रमुख प्रा. दुधाळ, प्रा. जाधव डी. एम. यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रथम वर्ष कोर्स कॉर्डिनेटर प्रा. तेजस्विनी आरडे , प्रा. गजानन खालापुरीकर , प्रा. आकांक्षा सवासे, प्रा.अशोक मुंडे, प्रा.मयुरी गोंटे ,प्रा. दुर्गे यांनी मेहनत घेतली.

### बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा परळी विधानसभेचे लाडके युवराज

## पोहनेर येथील बौद्ध बांधवांना बौद्ध विहार बांधून देऊन न्याय देतील का?

परळी । प्रतिनिधी

परळी विधानसभेतील पोहनेर या गावाला माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांनी त्यांच्या कार्य काळामध्ये दत्तक घेतले होते या कार्यकाळामध्ये तेथील बौद्ध विहाराची दयनीय अवस्था झालेली असताना सुद्धा जाणून-बुजून बौद्ध विहाराच्या विकासाकडे दुर्लक्ष करून तेथील बौद्धांची फक्त मते घेण्यापुरता दोन वेळेस पायाभरणी सोहळा घेतला असे गावकऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले . पण प्रत्यक्षात मात्र काम सुरू झाले नाही आणि त्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहता खालील फोटोतील बौद्ध विहाराची दयनीय झालेली अवस्था वंचित बहुजन आघाडी परळी विधानसभेच्या टीमने परळी विधानसभा मतदारसंघ अभियानाच्या निमित्ताने पोहनेर या गावी संपर्क साधण्यासाठी गेलो असता गावकऱ्यांच्या वतीने ही बाब निर्दशनास आणून देण्यात आली व आम्हाला बौद्ध विहार बांधून देऊन न्याय द्या असा टाहो फोडण्यात आला. याप्रसंगी वंचित बहुजन



आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे वंचित युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष राजेश सरवदे वंचित बहुजन युवक आघाडीचे शहराध्यक्ष प्रेम जगतकर युवक आघाडी शहर उपाध्यक्ष शुद्धोधन आचार्य उपस्थित होते. त्यावेळी गावकऱ्यांना मार्गदर्शन करताना वंचित बहुजन आघाडीचे युवा शहराध्यक्ष प्रेम जगतकर यांच्या वतीने बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा परळी विधानसभेचे लाडके युवराज यांना सवाल करण्यात आला की ,पोहनेर येथील आमच्या बौद्ध बांधवांना संपूर्ण बौद्ध समाजाचे आदर्श असलेले भगवान गौतम बुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर माता रमाई यांच्या जयंती साजरी करण्यासाठी बौद्ध विहार बांधून मिळेल काय?

## तुळजाभवानीच्या गाभाऱ्यात नवरात्रीच्या पूर्वसंध्येला रंगला खेळ पैठणीचा

### पाचशे महिलांचा सामूहिक गोंधळ गायनाचा रेकॉर्ड ब्रेक उच्चांक

बीड । प्रतिनिधी

गेल्या आठ दिवसापासून काकू नाना प्रतिष्ठान आयोजित होम मिनिस्टर संपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा या कार्यक्रमात महिलांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. याची प्रचिती अंबिका चौक परिसरात बन्सीधर नगर प्रभाग क्रमांक दहा येथील तुळजाभवानीच्या गाभाऱ्यात नवरात्रीच्या पूर्वसंध्येला रंगला खेळ पैठणीचा. माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाची निर्मिती झाली आहे या कार्यक्रमात बीड येथील माता भगिनींच्या उत्साह खूप मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे महिलांची गर्दीने परिसर फुलून जात आहे. या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे उद्घाटन सौ. सीमा चव्हाण सौ. अरविंदा गवते सौ.शेळके, सौ. छाया पेंढारे, सौ. चौसाळकर सौ.स्नेहल जाधव सौ. मंदाकिनी देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. महिला आघाडीच्या अध्यक्ष सौ जयश्रीताई विधाते माजी सभापती सौ उषाताई सरवदे, तो प्रेम लता ताई चांदणे सौ.किर्तीताई पांगारकर साळुंके, सौ. भारतीताई राजेश क्षीरसागर सौ. अंजलीताई पांगारकर यांची प्रमुख उपस्थिती




होती. महिलांचा उदंड प्रतिसाद मिळवणारा बीड शहरातील एकमेव कार्यक्रम आहे. प्रत्येक वार्डातील महिलांचा आगळा वेगळा उपक्रम ठरतआहे. या स्पर्धेत मानाची पैठणी विजेती महिला सौ. मीनाक्षी अनिल मेहेरकर या ठरल्या तर इमिटेशन ज्वेलरी च्या मानकरी सौ कल्पना नारायणराव कोठुळे, ठरल्या तर चौरगाच्या मानकरी सौ मीरा दीपक गोरे या ठरल्या तर उर्वरित सात महिलांना गिफ्ट देण्यात आले त्यामध्ये सौ. वैशाली अनिल पवार सौ. सारिका चंद्रकांत मिसाळ, सौ. भाग्यश्री अजय घोलप, सौ. शिकन्या सकाहरी शिंदे, सौ. अनिता विशाल घोलप,सौ. वृषाली रोहन देशमुख,सौ. जयगंगा तुकाराम साडे या महिला ठरल्या. सदर बक्षिसाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विजेत्या सर्व महिलांची ७ ऑक्टोबर रोजी पारस नगरी येथे होणाऱ्या अंतिम ङ्केरी करता निवड झाली आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नगरसेवक नागरी सामाजिक कार्यकर्त्या इत्यादी सह महिला भगिनी हजारोच्या संख्येने उपस्थित होत्या.

## करुणा मुंडे काढणार जनसंघर्ष यात्रा

### गुरूवारपासून यात्रेस शुभारंभ शेतकऱ्यांसह नागरिकांशी साधणार संवाद

वडवणी । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या राजकारणात करुणा मुंडेकडून मार्चाबांधणी करत शेतकर्यांच्या व्यथा, गोरगरिबांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी जनसामान्याच्या दारापर्यंत जावून संवाद साधणार असून जिल्ह्यातील नागरिकांसाठी जनसघर्ष यात्रेच्या माध्यमातून भेटीगाठी घेणार आहेत. या यात्रेला गुरूवारी शुभारंभ होणार आहे. अतिवृष्टीने शेतकर्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतल्याने शेतकरी हैराण झाला आहे. या शेतकर्यांना आधार देण्यासाठी अन जनसामान्यांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी करुणा मुंडे गुरूवार दि.२६ सप्टेंबर २०२४ रोजी पासून जिल्ह्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा यांना हार घालून यात्रेस सुरूवात करणार आहेत. त्या शहरातील महापुरूषांना अभिवादन करून यात्रेला सुरूवात करणार आहेत. यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुताळ, अण्णाभाऊ साठे, छ.शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच बार्शी नाका, पाली मंजेरी, मांजरसुंबा, पारगाव, चौसाळा, लिंबागणेश, नवगण राजुरी, रायमोहा, खालापुरी, खांबा लिंबा, शिरापुर, पौंडूल येथील शेतकर्यांना तसेच ग्रामस्थांना संवाद साधणार आहेत. मागील काही दिवसांपासून जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी झाल्याने शेतकर्यांच्या सोयाबीन, कापूस, बाजरी यासह अनेक पिक वाया गेले आहे. यामुळे शेतकरी हैराण झालेले असतांनाही कृषीमंत्री संस्कृतीक कार्यक्रम घेण्यात मग्न आहेत. तरी इतर सरकार पुढील निवडणुकीच्या कार्यक्रमात व्यस्थ आहे. अशा सरकारला जागा दाखविण्यासाठी अन जनसामान्यांच्या आवाजा वाव मिळवून देण्यासाठी करूणा मुंडेंनी जनसंघर्ष यात्रा काढली असल्याचे मत त्यांनी व्यत केले आहे.

## पान १ वरून

### परळीत पंकजा मुंडेंना...

बसणार नाही, असं त्यांनी सांगितलं आहे. परळीत राजकीय दडपशाहीचे वातावरण असल्याचा दावाही राजाभाऊ फड यांनी केला. ते म्हणाले, खोट्या केसेसमधून एकाही कामगाराची सुटका झालेली नाही. जेव्हा जेव्हा एखादा नेता विरोधी पक्षात जातो तेव्हा त्याच्यावर खोटे गुन्हे दाखल केले जातात. माझ्यावरही खोटा गुन्हा दाखल होईल, पण जनता आता पवार साहेबांसोबत आहे. त्यांनी महाराष्ट्राचे मंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांच्यावर परळीच्या विकासासाठी सरकारी निधीचा अपहार केल्याचा आरोप केला. बीड लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे राष्ट्रवादीचे नेते बजरंग सोनवणे यांनीही या सभेला संबोधित केले. एप्रिल-मेमध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत मुंडे यांचा पराभव करणाऱ्या सोनवणे यांनी महायुतीतील विशेषत: परळीतील वाढत्या असंतोषावर भर दिला. लोकसभेचे खासदार सोनवणे म्हणाले, आम्हाला विधानसभा निवडणुकीची वाट पाहण्याची गरज नाही. परळी काय करते आणि एखाद्याचा अपमान झाल्यावर काय होते हे लोकसभा निवडणुकीत दिसले. फड यांचा पक्ष बदल हा सत्ताधारी महायुतीला मोठा धक्का मानला जात आहे.

### परळीचा आमदार...

अजून बरेच आजी-माजी पक्षप्रवेश करणार आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यातल्या सहाही मतदार संघातील चित्र वेगळे राहणार असून पुन्हा एकदा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे वर्चस्व असेल. असे सुतोवाचक विधान खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केले. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्यावर विश्वास ठेवून परळी मतदार संघातील असंख्य कार्यकर्त्यांनी बुधवार (दि.२५) रोजी मुंबई येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या कार्यालयात शरद पवार यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला.

### आमदारांच्या टक्केवारीमुळेच...

घाईघाईत करून घेतले. परंतु, वाट्टेल तितकी टक्केवारी घ्यायची सवय झाल्याने या कामात डिव्हायडर उभारण्यात आले नाही. दुतर्फा नाल्या करण्यात आल्या नाहीत. परिणामी, झालेल्या पावसाने पाणी व्यवसायिकांच्या दुकानांसह घरांमध्ये शिरले. डिव्हायडर नसल्याने अनेकदा गाड्या स्लिप होऊन अपघात होत आहेत. नागरिकांना होत असलेला त्रास आमदारांनी काम करताना केलेल्या हस्तक्षेपामुळे होत आहे. त्यांच्या काम करण्याच्या चुकीच्या पद्धतीची फळे बीडवासियांना भोगावी लागत आहेत, असेही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

### बीडच्या मोंढा रोडसह...

दखल घेऊन पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी या रस्त्यासाठी निधी देण्याची ग्वाही दिली होती. त्यानुसार पालकमंत्र्यांच्या सूचनेवरून दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून २०२४-२५ अंतर्गत शिव शारदा बिल्डिंग जालना रोड ते अमरधाम स्मशानभूमी (मोंढा रोड) या कामासाठी ४ कोटी २० लक्ष रुपयांचा निधी मंजूर केला आहे. टेंडर प्रक्रिया जवळपास संपत आलेली आहे, वर्क ऑर्डर होताच येत्या आठ ते दहा दिवसात राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजयजी मुंडे यांच्या हस्ते व माजी आमदार अमरसिंहजी पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत या कामास प्रत्यक्ष सुरुवात होणार असल्याची माहिती नगरसेवक अमर नाईकवाडे व गटनेते फारुख पटेल यांनी दिली आहे.

## पान १ वरून

### पालकमंत्री मुंडे, अमरसिंह पंडित यांचे मानले आभार

टेंडर प्रक्रिया पूर्ण होताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. नव्या आणि जुन्या बीड शहराला जोडणार्या या महत्वाचे रस्ता काम मार्गी लावल्याबद्दल अमर नाईकवाडे यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे तसेच माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत. लवकरच मोंढा रोडसह बीड शहरातील सर्वच मंजूर करण्यात आलेल्या विकास कामांचे उद्घाटन पालकमंत्र्यांच्या हस्ते करून प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे अशी माहिती अमर नाईकवाडे यांनी दिली आहे. सणासुदीच्या काळात नागरिकांची गैरसोय न होऊ देता रस्ता काम सुरू राहणार येणाऱ्या काळात नवरात्र उत्सवामुळे नागरिकांची गैरसोय होऊ नये याची काळजी घेऊन सदरील रस्ता काम सुरू करण्यात येणार आहे. तसेच कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यानंतर आचारसंहितेचा कसलाही परिणाम या कामावर होणार नाही त्यामुळे नागरिकांनी अफवांना बळी पडू नये असे आवाहन देखील नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी केले आहे.

### भाजप ॲक्टिव्ह...

आगमन होईल. तेथून ते साडेपाचला अंबाबाई मंदिरात येतील. तेथून दर्शन घेऊन सहा वाजता ते महासैनिक दरबार हॉलमध्ये मेळाव्यासाठी उपस्थित राहतील. ते मेळावा संपल्यावर रात्री आठला विमानाने दिल्लीकडे रवाना होतील. कोल्हापूर जिल्हा हा सहकाराच्या दृष्टीने महत्वाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने, गोकुळ दूध संघ, जिल्हा बँक यांच्या माध्यमातून या जिल्ह्याचे राजकारण चालत लोकसभा निवडणुकीमध्ये देखील अमित शहा यांनी कोल्हापूरमध्ये एक दिवस थांबून मोर्चेबांधणी केली होती यानंतर कोल्हापुरातल राजकीय वातावरण देखील फिरल. याचा विचार करून भाजपने कोल्हापुरातूनच विधानसभा निवणुकीच्या प्रचाराला सुरूवात करण्याचा निर्णय घेतला आहे. या सर्व मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर शहरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला असून वरीष्ठ अधिकाऱ्यांसह आठशे पोलिसांचा बंदोबस्त तैनात आहे. शहरातील वाहतूक मार्गांमध्येही बदल करण्यात आला आहे. महासैनिक दरबार हॉलमध्ये गृहमंत्री शहा यांच्या मेळाव्यावेळी धैर्यप्रसाद चौक ते लाईन बझार मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद केली जाणार आहे. तसेच त्यांचा वाहन ताफा विमानतळाहून धैर्यप्रसाद चौक मार्गावर विरुद्ध दिशेने जाणार आहे. दरम्यान, एक अपर पोलिस अधीक्षक, ८ उपअधीक्षक, १९ पोलिस निरीक्षक, ७५ सहायक पोलिस निरीक्षक आणि उपनिरीक्षक, तसेच ७०२ अंमलदारांचा असा बंदोबस्त तैनात असणार आहे.

कागदपत्रे हरवले आहेत

आमचे पक्षकार श्री नवनाथ लक्ष्मण मोरे ह.मु.बीड यांचे सोमेश्वर नगर ते कलेक्टर ऑफीस बीड या प्रवास दरम्यान गाडीतून बस प्रवासात कागदपत्रे असलेली बॅग गहाळ झालेली आहे. त्यामध्ये मुळ मालकीच्या प्रॉपर्टीच दस्तऐवज ४१५३/२०१० हा दस्त हरवला आहे. तरी सापडल्यास खालील नंबरवर संपर्क करावा / साधावा. मो. ७३५०६८२२११

प्रेषक ——————
ॲड. अर्चना गणेश मदने (मॅडम)
मो. ९०२१३२२८५३

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १२५२/२०२४**

**ॲड. शिंदे एस. बी.**

अर्जदार– १) हिराबाई उध्दव काळेबेरे, वय ६६ वर्षे, धंदा–घरकाम, रा. नेकनूर, ता. जि.बीड. २) संतोष उध्दवराव काळेबेरे, वय–३६ वर्षे, धंदा – मजुरी, रा. नेकनूर, ता. जि. बीड. ३) सुरज उध्दवराव काळेबेरे, वय–३० वर्षे, धंदा – मजुरी, रा. नेकनूर, ता.जि.बीड

**विरुध्द**

**गैरअर्जदार :– निरंक**

**अर्जदार हे भारतीय आहेत**

**प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत नामे उध्दव शंकरराव काळबेरे** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे **उध्दव शंकरराव काळबेरे, रा. नेकनूर, ता. जि. बीड हे दिनांक ०१/०२/२०१९ रोजी मौजे नेकनूर, ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार कं. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्रं. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई वडील बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील दिनांक ०८/१०/२०२४**

आज दिनांक ०३ /०९/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एफ.बी. बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १३१२/२०२४**

**जिजाबाई वि. कोणीही नाही**

**विधीज्ञ एस. एस. उबाळे**

मागणी:– **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदारः १) जिजाबाई भ्र. राजेंद्र झुनगुरे, वय– ४४ वर्षे, धंदा' घरकाम, आय.टी.आय.मागे सर्कस मैदान–पुर्व–बीड ता. जि. बीड. २) शुभम राजेंद्र झुनगुरे, वय– २७ वर्षे, धंदा' शिक्षण. रा. आय.टी. आय. मागे सर्कस मैदान–पूर्व–बीड ता. जि. बीड ३) ऋषीकेश राजेंद्र झुनगुरे, वय–२४ वर्षे, धंदा' शिक्षण रा– आय.टी.आय. मागे सर्कस मैदान–पुर्व–बीड ता. जि. बीड

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे **सुशिलाबाई भ्र. बाबासाहेब झुनगुरे हे राहणार उखंडा ता.पाटोदा जि. बीड हे दिनांक ३०/०७/२०२४ रोजी उखंडा ता. पाटोदा जि. बीडयेथे मयत झालेल्या / झालेले आहेत.**

**अर्जदार क्र. १ ही मयत नामे सुशिलाबाई भ्र. बाबासाहेब झुनगुरे, यांची सून असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे नातू म्हणजे मयताचा मयत मुलगा राजेंद्र यांचे मुले आहेत.**

यांचे निधन झालेले आहे. मयत नामे सुशिलाबाई भ्र. बाबासाहेब झुनगुरे, मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की,जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत **सुशिलाबाई भ्र. बाबासाहेब झुनगुरे,** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख २२/१०/२०२४ आहे.**

आज दिनांक १८/०९/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीम. डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज १३३६/२०२४**

**विठठल गिते विरुध्द बाबासाहेब गिते**

**ॲड. उबाळे एस. एस.**

अर्जदार :– १) विठठल पि.रामचंद्र गिते, वयः ७७वर्षे, धंदा: शेती, रा. रूद्रापुर, ता. जि. बीड. २) सौ. पुष्पा भ्र. राजाभाउ खाडे, वय : ७४वर्षे, धंदा:घरकाम, रा. वंजारवाडी ता. जि. बीड ३) मंदाकिनी भ्र.दिनकर मोराळे, वय : ६९वर्षे, धंदा: घरकाम, रा. वंजारवाडी ता. जि. बीड ४) शोभा भ्र ज्ञानोबा सानप, वय : ४८वर्षे, धंदा घरकाम, रा. तागडगांव ता. शिरूर जि. बीड

विरुध्द

१) बाबासाहेब पि.रामचंद्र गिते, वय: ७५ वर्षे, धंदा: शेती, रा. रूद्रापुर, ता. जि. बीड. २) उध्दव पि.रामचंद्र गिते, वय : ५१ वर्षे, धंदा शेती, रा. रूद्रापुर ता. जि. बीड. ३) सुभद्रा भ्र. जनार्धन सांगळे, वय : ७१ वर्षे, धंदा: घरकाम, रा. उक्कडपिंप्री ता. जि. बीड

निरंक

**मागणी अर्जः– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र** (Heirship Certificate) **मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे **रामचंद्र सोनाजी गिते व आसराबाई भ्र. रामचंद्र गिते** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे रामचंद्र सोनाजी गिते व आसराबाई भ्र. रामचंद्र गिते दोन्ही रा. मौजे रूद्रपूर ता. जि. बीड यांचा **मृत्यु दिनांक : २६/१०/२०१४ व ०१/०६/२०२३ रोजी** दोघांचा राहते घरी मौजे रूद्रापुर, ता. जि. बीड येथे झाला. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ व २ हे आपसांत सख्खे भाउ असून, अर्जदार क. २ ते ४ व गैरअर्जदार क्र. ३ या त्यांच्या सख्खा बहिणी आहेत. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु **मयत रामचंद्र सोनाजी गिते व आसराबाई भ्र. रामचंद्र गिते** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४/०९/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक ०४/१०/२०२४.**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२९५/२०२४**

**मोहन भिवा बांगर वि. निरंक**

**ॲड. डी.एम. रोटे**

अर्जदार– १. मोहन पि. भिवा बांगर, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. खंडाळा, ता. जि. बीड. २. ओमकार पि.मोहन बांगर, वय १४ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क. वडील अर्जदार क्र. १ रा. सदर

**गैरअर्जदार – निरंक**

**प्रकरण – भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत **शोभा भ्र. मोहन बांगर,** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत **शोभा भ्र. मोहन बांगर, यांचा दिनांक १९/०१/२०२४ रोजी राहते घरी रा. खंडाळा, ता.जि.बीड,** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ हे मयताचे पती असून अर्जदार क्र.२ हा मयताचा मुलगा आहे. यांच्या शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे शोभा भ्र. मोहन बांगर, या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे **शोभा भ्र. मोहन बांगर, रा. खंडाळा, ता. जि. बीड.** यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख २५/१०/२०२४.**

आज दिनांक २४/०९/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १२९६/२०२४**

CNR No. MHBI0200026242024

**उषा तानाजी पंडित व ३ इतर वि. निरंक**

**(मार्फत – ॲड. डी. एम. रोटे)**

अर्जदार :–१. उषा भ्र. तानाजी पंडीत, वय–४५ वर्ष, धंदा–घरकाम, रा. मंत्री गल्ली, सराफा रोड, बीड ता. जि. बीड. २. सुरज पि. तानाजी पंडीत, वय–२६ वर्ष, धंदा–मजुरी, रा. सदर ३. संकेत पि. तानाजी पंडीत, वय–२५ वर्ष, धंदा–मजुरी, रा. सदर ४. गणेश पि. तानाजी. पंडीत, वय–२३ वर्ष, धंदा–मजुरी, रा. सदर

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ ते ४ यांनी या न्यायालयात **मयत तानाजी पि. देविदास पंडीत** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत **तानाजी पि. देविदास पंडीत** यांचा मृत्यु दिनांक **१३/११/२०२०** रोजी जिल्हा रूग्णालय, बीड ता.जि. बीड येथे त्यांचा मृत्यु झाला आहे. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क १ हि मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ते ४ हे मयताची मुले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत **तानाजी पि. देविदास पंडीत** यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

**प्रकरणातील पुढील तारीख ११/१०/२०२४**

आज दिनांक १३ माहे सप्टेंबर २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, शिरुर का. यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं.२०८ / २०२४**

**विठ्ठल विरुध्द निल**

**ॲड. एच. एस. कोठुळे यांच्या मार्फत**

अर्जदार :– विठ्ठल पि. भाणुदास चव्हाण वय ५९ वर्षे, धंदा शेती, रा. जाटनांदुर, ता. शिरुर का., जि. बीड मो. नं. ९७३०३९५५००.

विरुध्द

निल

**अर्ज – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत....**

ज्यापेक्षा मयत नामे **सोजरबाई भ्र. भिमराव जेधे, रा. सवसवाडी तहत जाटनांदुर, ता. शिरुर का., जि. बीड, यांचा मृत्यु दिनांक दि. ३०/०३/२०२४ रोजी** जिल्हा रुग्णालय, अहमदनगर, येथे मयत झाले असुन अर्जदार हा मयताचा सख्खा भाऊ आहे. तसेच अर्जदार हा मयताचा कायदेशीर वारस आहे, असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हा उपरोक्त मयताचा वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार ह्यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०४/०९/२०२४ रोजी माझ्या सहिने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख –१५/१०/२०२४

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) सहा. अधीक्षक

दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर का.,

## जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती एफ.बी.बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १२९७/२०२४**

**शेख अमतुल वि. कोणीही नाही**

**विधीज्ञ डी. एम. रोटे**

**मागणी:– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदारः १) शेख अमतुल मुजीब शेख ताहेर, वय– ६४ वर्षे, धंदा– घरकाम, पत्ता – पोलिस पेट्रोल पंपाजवळ, चाऊस नगर, नगर रोड बीड ता.जि.बीड. २) शेख शेहनाझ बानो ताहेर हुसेन, वय– ६० वर्षे, धंदा– घरकाम, अजमेर नगर, बालेपीर बीड ता. जि. बीड. ३) शेख अमतुल जमील शेख ताहेर हुसेन, वय– ५६ वर्षे, धंदा– घरकाम, ४) मुमताज बानो शेख ताहेर हुसेन, वय– ४८ वर्षे, धंदा– घरकाम, ५) शेख अमतुल रफिया ताहेर हुसेन, वय– ४३ वर्षे, धंदा– घरकाम, ६) शेख खमर अली ताहेर हुसेन, वय– ४७ वर्षे, धंदा–मजुरी ७) शेख सादेक शेख ताहेर हुसेन, वय– ३९ वर्षे, धंदा– मजुरी, अर्जदार क्र. ३ ते ७ पोरवाल गल्ली, जुनी भाजी मंडई बीड ता. जि. बीड

**विरुध्द निरंक**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे खादरा बी शेख अली हे राहणार पोरवाल गल्ली, जुनी भाजी मंडई बीड ता.जि.बीड हे दिनांक १३/०८/१९८३ रोजी बीड ता. जि. बीड येथे मयत झालेल्या / झालेले आहेत.

अर्जदार क. १ ते ५ या मयत नामे खादरा बी शेख अली, यांच्या मुली आहेत. अर्जदार क ६ व ७ हे मयताचे मुले आहेत.

मयत नामे **खादरा बी शेख अली** यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की,जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, यांचे वारस त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु **मयत खादरा बी शेख अली** असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख १९/१०/२०२४ आहे. आज दिनांक १८/०९/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा.श्री ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १२९८/२०२४**

**बाबुराव पि. रामभाऊ चौरे व ईतर विरूध्द निरंक**

**ॲड. रोटे डी.एम. यांच्या मार्फत**

अर्जदार – १. बाबुराव पि. रामभाऊ चौरे, रा. एकनाथ नगर, भक्ती कन्स्ट्रक्शन, बीड, ता.जि. बीड. २. हौसेराव पि. रामभाऊ चौरे, रा. वरील प्रमाणे. ३. कल्याण पि. रामभाऊ चौरे, रा. खंडाळा, ता. जि. बीड. ४. शिवगंगा भ्र. गोकुळ नागरगोजे, रा. जयवंत नगर, पाथरुड, ता. भूम जि.उस्मानाबाद(धाराशिव). ५. सुशीला भ्र. उत्तम जायभाये, रा. खंडाळा, ता. जि. बीड. ६. सिंधु भ्र. शाहु जायभाये, रा. वरील प्रमाणे

**विरुध्द निरंक**

**मागणी– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत रामभाऊ पि. धोंडीबा चौरे** यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी **मयत रामभाऊ पि. धोंडीबा चौरे** यांचा मृत्यु दिनांक २५/०६/२०१२ रोजी झाला आहे. यांचे मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत रामभाऊ पि. धोंडीबा चौरे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू **मयत रामभाऊ पि. धोंडीबा चौरे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५/०९/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक १८/१०/२०२४ आहे.**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही.सी. जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १३९३/२०२४**

**ॲड.टी.एम. रोटे यांच्या मार्फत**

**अजमत सादेख असार वि. निरंक**

ज्यापेक्षा **निलोफर अजमत अतार, रा.नेकनुर ता.जि. बीड ही दिनांक २९/१२/२०२२ रोजी** डॉ. विखे पाटील हॉस्पीटल अहमदनगर ता.जि.अहमदनगर येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१. अजमत पि. सादेख अत्तार, वय–४१ वर्षे, धंदा :– व्यापार, रा. नेकनुर ता.जि.बीड. २ आरीबा पि.अजमत अत्तार, वय–०२ वर्षे, अज्ञान अ.पा.क. बडील अर्जदार कं १ रा. सदर

अर्जदार क १ हे मयत नामे **निलोफर अजमत अत्तार,** हिचे पत्ती असून, अर्जदार कं २ ही अज्ञान असुन तिचे अ.पा.क्र. वडील अर्जदार कं १ हे आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयता इतर दुसरे कोणीही वारस माहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या जर सदरहू मुदतीत हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास. त्यांना / अर्जदारांना सदरहू पुरावा निलोफर अजमत अतार, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख ०५/११/२०२४ आहे.**

आज दिनांक २५ सप्टेबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री.ए.एम.पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १२४२/ २०२४**

**ॲड. तावरे. जी. एच यांच्या मार्फत**

**यमुना गिते वि. जनाबाई**

ज्यापेक्षा महादेव पि. भाउ गिते, हे दिनांक ०४.०५.१२०१८ रोजी रा. खंडळा, ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१. यमुना भ्र. महादेव गिते, वय–७५ वर्षे, रा.खंडाळा, ता.जि.बीड

२ दादाहरी पि. महादेव गिते, वय–७५ वर्षे, रा. खंडाळा, ता. जि. बीड

३. हिरामन पि. महादेव गिते. वय – ४५ वर्षे, रा. खंडाळा, ता. जि. बीड

विरुध्द

गैरअर्जदारः– १. जनाबाई भ्र. बाबासाहेब चौरे वय – ४५ वर्षे रा. जिवाचीवाडी ता. केज जि. बीड

अर्जदार क्र १ ही मयताची पत्नी असुन. अर्जदार क्र. २ ते ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच गैरअर्जदार ही मयताची मुलगी आहे मयत नामे **महादेव पि. भाउ गिते,** यांचे आई व वडील व पत्नी बऱ्याच वर्षापुर्वी मयत झाले आहेत. या अर्जदार व गैरअर्जदारां व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार व गैरअर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होंऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत **महादेव पि. भाउ गिते,** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. **प्रकरणाची पुढील तारीख ०५/१०/२०२४ आहे.**

आज दिनांक २३ सप्टेबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १२९९/२०२४**

**ॲड. रोटे डी. एम. यांच्या मार्फत**

अर्जदार – १) निलावती गंगाराम काळे, वय–७५ वर्षे, धंदा–घरकाम, रा. नाळवंडी ता. जि. बीड. २) प्रकाश गंगाराम काळे, वय–५४ वर्षे, धंदा–मजुरी, रा. नाळवंडी ता. जि. बीड. ३) यमुनाबाई अभिमान कटारे, वय–४४ वर्षे, धंदा–घरकाम, रा.गुगळी धामनगांव ता. सेलु जि. परभणी

**विरुध्द**

**गैरअर्जदार :– निरंक**

**अर्जदार हे भारतीय आहेत**

**प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे गंगाराम पि. भगवान काळे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे **गंगाराम पि. भगवान काळे, रा. नाळवंडी, ता. जि. बीड हे दिनांक २८/०६/२०१७ रोजी नाळवंडी, ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार कं. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार कं. २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार कं. ३ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताचे आई वडील बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून संदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या. न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी. **पुढील दिनांक १६/१०/२०२४**

आज दिनांक २५/०९/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस.एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क.१३७१ / २०२४**

**आत्माराम रंगनाथ फाटक वि. निरंक**

**ॲड. एस. बी. कोकाटे यांच्या मार्फत**

अर्जदार– १. आत्माराम पि. रंगनाथ फाटक, वय ७५ वर्षे, धंदा शेती, रा. वरवटी, ता. जि. बीड. २.भिमराव पि. रंगनाथ फाटक, वय ६७ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ३. अर्जुन पि. रंगनाथ फाटक, वय ५७ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ४. सत्यभामा प्र.बंकट येडे, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंजनवती, ता. जि. बीड.

**गैरअर्जदार –निरंक**

**प्रकरण– भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत अश्रुबा पि.गणपती भोसले,** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत **राणीबाई भ्र. रंगनाथ फाटक, यांचा दिनांक १३/०३/२०२१ रोजी** राहते घरी रा. वरवटी, ता.जि.बीड, येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ते३ ही मयताची मुले असून अर्जदार क्र.४ ही मयताची मुलगी आहे. यांच्या शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे **राणीबाई भ्र. रंगनाथ फाटक,** या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे **राणीबाई भ्र. रंगनाथ फाटक, रा. वरवटी, ता. जि. बीड.** यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील तारीख १३/११/२०२४.**

आज दिनांक २३/०९/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

जनसामान्यांचे शस्त्र, दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

● गुरूवार, दि.२६ सप्टेंबर २०२४ ● पान ४

## थोडक्यात

### 30 सप्टेंबर रोजी भ्रष्टाचार निर्मुलन समिती बैठक

बीड । प्रतिनिधी

जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड तथा जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हयातील शासकीय कर्मचा-याविरुध्द प्राप्त होणा-या तक्रारींबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती स्थापन करण्यात आली असून त्याअनुषंगाने नागरिकांनी शासकीय अधिकारी, कर्मचा-याविरुध्द भ्रष्टाचारासंबधी तक्रार असल्यास जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीसमोर व्यक्तीश: उपस्थित राहून लेखी स्वरुपात मांडाव्यात सदर तक्रारीसोबत पुरावे जोडले गेले नसल्यास अशा तक्रारी घेतल्या जाणार नाहीत, असे सदस्य सचिव जिल्हा भ्रष्टाचार निवारण समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### शनिवार दि. २८ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

शनिवार दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी बीड जिल्हा न्यायालयात व सर्व तालुका न्यायालयात राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हा विधीसेवा प्राधिकरणचे सचिव यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### कालिका नवरात्र महोत्सवाची कार्यकारिणी जाहीर; अध्यक्षपदी बंडु देवगुडे उपाध्यक्षपदी बिभीषण नन्नवरे




नेकनूर । प्रतिनिधी

कालिका नवरात्र महोत्सवाची कार्यकारिणी बैठक ओंकार मंडप चे मालक बंडु शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सर्वानुमते अध्यक्षपदी बंडु शेठ देवगुडे तर उपाध्यक्षपदी बिभीषण नन्नवरे यांची निवड करण्यात आली.सचिव पदी किशोर चव्हाण, सहसचिव पदी बाळु शिंदे ,खजिनदार पदी समाजसेवक अरविंद भाऊ जाधव तर कार्याध्यक्ष पदी रील स्टार लखन भैय्या चव्हाण यांची निवड करण्यात आली.या यावेळी बैठकीत नऊ दिवस नऊ वेगवेगळे कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे अध्यक्ष बंडु देवगुडे यांनी सांगितले. रोज फराळ वाटप करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्रातील नामांकित गायक,मर्द मराठ्याच पोर फेम ,आरती साडेतीन शक्तीपीठाची फेम संबळ सम्राट अभिजीत जाधव व दीमडीसम्राट अमर जाधव यांचा शिवगीते,गोंधळ, व भक्तीगीते स्फुर्तिगीतांनी सजलेला रुबाबदार कार्यक्रम व महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहेत.या बैठकीस उपस्थित मा.ग्रा.सदस्य सतीश मुळे, दादाराव जाधव,उपसरपंच सचिन शिंदे,पिंटु शेठ रोकडे ,सत्यराम केसकर, विष्णू जगताप, श्रीराम राऊत, दिपक मुळे,रोहण मुळे, श्रीकांत मुळे,बबन कानाडे,नारायण कानाडे,सनतकुमार सोंडगे,बाळकृष्ण जवकर ,रोहीत काळे .

### संस्थेतील प्राध्यापकांचा विद्यार्थ्यांशी सुसंवाद निर्माण व्हावा- डॉ.राहुल खडके

बीड । प्रतिनिधी

संस्थेतील प्राध्यापकांचा विद्यार्थ्यांशी सुसंवाद निर्माण होणे गरजेचे आहे. त्यांना शैक्षणिक वातावरणाशी जुळवून घेता यावे व तंत्रनिकेतनाचे शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल या साठीच संस्था सदैव प्रयत्नशील असते. संस्था तसेच महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आदित्य शिक्षण संस्थेत नेहमीच विविध उपक्रम राबवले जातात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होतो. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.राहुल खडके यांनी केले. शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरिता आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य पॉलीटेक्निक मध्ये प्रथम वर्षीय विद्यार्थ्यांसाठी कार्यपरिचय उपक्रम व विद्यार्थी ,पालक स्वागत मेळावा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

# सिओ अंधारे मॅडम बीड शहरामधील साफ-सफाईकडे जातीने लक्ष द्या : नवनाथ शिराळे

**जालना रोडचे काम झाले मात्र नाली केली नाही. आहे त्या नाली वरील अतिक्रमण न काढता वरवरची सफाई केल्याने तुंबले पाणी**

**बीड शहरात घाणीचे साम्राज्य दिड महिने ३० लाख रूपये खर्च करून मान्सूनपूर्व स्वच्छता, तरीही व्यापाऱ्यांच्या दुकानात पाणी**





बीड । प्रतिनिधी

दोन दिवसापासून बीड शहरामध्ये वरूनराजा बरसत असून, मुसळधार पावसामुळे बीड शहराला तलावाचे स्वरूप आले आहे. याकडे गांभीर्याने लक्ष देऊन, स्वच्छता मोहीम राबवावी. असे आवाहन नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की गेली दोन दिवसपासून बीड शहरामध्ये प्रचंड मुसळधार पाऊस बरसला असून, शहरातील व उप नगरातील नाल्या गटारे तुंबल्यामुळे सर्व रस्ते, दुकाने, हॉटेल इत्यादीमध्ये पाणी शिरले आहे. याकरिता अंधारे मॅडम आपण बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी आहात, शहरातील सर्व सामान्य व्यापारी यांचा व्यवसाय डबघाईस आला आहे. अस्वच्छतेमुळे रोगराई वाढण्याची शक्यता आहे. डास निर्मुलन करिता शहरात धूर फवारणी करावी.तसेच शहरामध्ये अंधाराचे साम्राज्य असून, पथदिवे बसवण्यासाठी जातीने लक्ष द्यावे. सर्व व्यापारी मंडळी बीड नगरपालिकेकडे इमाने इतबारे व्याजासह घर पट्टी, नळ पट्टी इत्यादी टॅक्स भरत आहेत. याबत अंधारे मॅडम बीड शहरात फेर फटका मारून संबधितांना आदेश देऊन, नाले, गटारे साफसफाई मोहीम राबवावी, अन्यथा सर्व सामान्य नागरिकांसह व्यापारी मंडळी रस्त्यावर उतरतील याची आपण गांभीर्याने दखल घ्यावी. असे आवाहन भाजपा जेष्ठ नेते तथा माजी नगर परिषद सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.

बीड पालिकेने मान्सूनपूर्व शहरात १३ मे २०२४ पासून दिड महिना स्वच्छता मोहिम राबवली. या मोहिमेसाठी पालिकेच्या २ तर किरायाने २ अशा ४ जेसीबी, ३ टेम्पो, ४० तात्पुरते तर पालिकेचे २०४ कर्मचारी, २४ ट्रॅक्टर, मोठे ३ टॅम्पो, आणि ६ स्वच्छता निरीक्षक असा ताफा होता. त्यांच्या ३० लाखाचा खर्च करण्यात आला. दरम्यान १२ मोठ्या नाल्यांची सफाई केली असल्याचे पालिकेच्या वतीने सांगण्यात येते मात्र प्रत्यक्षात वरवरची नाले सफाई केली. जालना रोड सिमेंटचा करण्यात आला. मात्र यावेळी दोन्ही बाजूने नालीचे काम करण्यात आले नाही. जालना रोडच्या पश्चिम बाजूने असलेल्या नालीची स्वच्छता करतानाही व्यापारी, नागरिकांनी केलेले अतिक्रमण, नालीवर टाकलेले ढापे न काढता पालिकेने वरवरची स्वच्छता केली त्यामुळे रविवारी रात्री आणि सोमवारी दुपारी झालेल्या पावसाने पाणी तुंबून ते व्यापारी, नागरिकांच्या घरात शिरले.



● स्वच्छतेचे टेंडर संपल्यानंतर तब्बल दिड महिन्याने बीड पालिकेने त्याच कंत्राटदाराला तात्पुरते टेंडर दिले. तोपर्यंत शहरातील रोजचा ७२ टन कचरा तसाच पडून राहता होता. त्यातील केवळ ७ घंटागाड्यांनी दररोज जेवढा होईल तेवढा उचलला जात होता. त्यामुळे शहरात प्रचंड दुर्गंधी सुटलेली आहे. तर पालिकेच्या वतीने मान्सूनपूर्व १२ नाल्याची केलेली सफाई ही देखील वरवरची असल्याचे रविवारी रात्री आणि दुपारी बीड शहरामध्ये झालेल्या जोरदार पावसातून उघड झाले. पांगरी रोड, शाहू नगर, जालना रोड पश्चिम बाजू येथील व्यापारी आणि नागरिकांच्या घरात पाणी शिरले.

▶ नाल्या साफ न केल्यामुळे आमच्या दुकानात पाणी शिरले जालना रोडवरील पश्चिम भागातील नाली पालिकेच्या वतीने साफ करण्यात आली नाही. ही नाली अत्यंत छोटी आहे. शाहू नगर भागातील पाणी या नालीत बसत नाही. थोडा पाऊस आला तरी कचऱ्यामुळे तुंबते आणि आमच्या दुकानात पाणी शिरते. रविवारी रात्रीच्या पावसाने दुकानात पाणी शिरले. आम्ही ते दुपारी मोटारीने काढले. पुन्हा दुपारी पाऊस झाल्यानंतर पाणी शिरले. यामुळे सामानाचे नुकसान झाले आहे. -सय्यद मुस्तैब अली, दुकानदार, जालना रोड

▶ अर्धवट रस्ता आमच्याकडे हस्तांतरित केला, नाली कामासाठी प्रस्ताव पाठवला आहे. एनएएचआय विभागाच्या वतीने बीड शहरातील जालना रोडचे काम करण्यात आले आहे. त्यांनी ते पूर्ण केले नाही. त्यानंतर आमच्याकडे हा रस्ता वर्ग करण्यात आला आहे. दोन्ही बाजूने नाली आणि पेवर ब्लॉक साठी प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. मात्र त्याला अद्याप मंजूरी मिळाली नाही. -सी.पी. बोराडे, बांधकाम अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग, बीड

▶ व्यापारी ढापे काढून देत नाहीत जालना रोडवरील नालीवर व्यापाऱ्यांनी मोठ-मोठे ढापे टाकले आहेत. ते ढापे व्यापारी काढून देत नाही. आम्ही स्वच्छता मोहिमेदरम्यान ते काढण्याचा प्रयत्न केला, मात्र राजकीय पुढाऱ्यांना फोन करून स्वच्छता मोहिम बंद पाडली जाते. पांगरी रोड भागातीलही व्यापारी आणि नागरिक कचरा रस्त्यावर टाकत असल्यानेच तेथेही नाल्या तुंबतात. इतर भागात मान्सून पूर्व स्वच्छता मोहिम राबवल्याने कोठेही पाणी तुंबलेले नाही. रूपकांत जोगदंड, स्वच्छता निरिक्षक, बीड

## क्रांतिसुर्य कै अण्णासाहेब पाटील यांच्या जयंती निमित अभिवादन

बीड । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचा प्रश्न पहिल्यांदा मांडणारे, मराठा आरक्षणासाठी हौतात्म्य स्विकारणारे क्रांतीसुर्य कै. अण्णासाहेब पाटील यांच्या जयंती निमित आज बीड मधे अभिवादन कार्यक्रमाचे मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष बापुसाहेब साळुके यांनी आयोजन केले होते.



कै. अण्णासाहेब पाटील यांनी मराठा समजला आरक्षण मिळावे या साठी मोर्चा मुंबई मधे काढलेला होता. त्या वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले होते. अण्णासाहेब पाटील यांनी मोर्चा वेळी सरकारला इशारा दिला होता उद्याचा सूर्य उगवायचा आत मध्ये मराठा समाजाला आरक्षण ची घोषणा करा नसता हा अण्णासाहेब पाटील उद्याचा सुर्य बघणार नाही अशी भीष्म प्रतिज्ञा त्यावेळी अण्णासाहेबांनी केली, सरकारणी गंभीर पानाने दखल न घेतल्या मुळे अण्णासाहेब पाटील यांनी उद्याचा सूर्य उगवायचा आत मधे अण्णासाहेब पाटील यांनी बलिदान मराठा समाज साठी दिले. कै अण्णासाहेब पाटील यांचे खूप उपकार मराठा समाजावर आहेत,मराठा समाज अण्णासाहेब पाटील यांचे बलिदान वाया जाऊ देणार नाही.असे प्रतिपादन मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंके यांनी केले . या वेळी मराठवाडा उपाध्यक्ष नारायणराव थोरात विद्यार्थी विद्यार्थी जिल्हाध्यक्ष भागवत मस्के बीड जिल्हा उपाध्यक्ष अशोकराव जोगदंड बीड जिल्हा उपाध्यक्ष सुमंत खाडे सर बीड शहराध्यक्ष दत्ता शेळके पाली सर्कल प्रमुख रंजीत शेळके अभिवादन करण्यासाठी पदाधिकारी उपस्थित राहिले होते.

## तर एकरी शंभर टन ऊस उत्पादन घेण्यासाठी योग्य नियोजनाची गरज : श्री सुरेश माने पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

योग्य निचऱ्याची जमीन, शाश्वत पाणी , बारा महिने सूर्यप्रकाश आणि मेहनती शेतकऱ्याने योग्य नियोजन केल्यास एकरी शंभर टन उस उत्पादन घेणे शक्य आसे प्रतिपादन श्री सुरेश माने पाटील माजी शास्त्रज्ञ वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट मांजरी पुणे यांनी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन आत्मा अंतर्गत तालूका कृषी अधिकारी माजलगाव कार्यालय यानी पंचायत समिती सभाग्रह येथे काल मंगळवारी आयोजित किलेल्या शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमात केले पुढे बोलतांना माने म्हणाले की , ,ठिबक सिंचनाचा योग्य वापर माती परीक्षणावर आधारीत रासायनिक खताचा वापर आणी




मातीआड करून देणे ,म्हणत शेतकऱ्यांनि जमिनीची निचरा पद्धत वापरणे खूप महत्वाचे असल्याचे सांगत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री एस. एस .संगेकर तालुका कृषी अधिकारी माजलगाव यांनी केले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. डोंगरे सहाक गट विकास माजलगाव पंचायत समिती माजलगाव उपस्थित होते प्रमुख पाहुणे म्हणून श्री सुरज पाटील प्रकल्प उपसंचालक आत्मा बीड,श्री सिद्धेश्वर हजारे कृषी अधिकारी पंचायत समिती , शेजुळ पशुधन विकास अधिकारी,श्री ॲड डी वाघमोडेमंडळ कृषी अधिकारी केसापुरीआणि कृषी विभागातील कृषी सहाय्य कृषी सहाय्यक ,कृषी प्रवेशक,आत्मा कर्मचारी आणि तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर शेतकरी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपीनाथ पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी केले,आभार प्रदर्शन श्री गौरव बापमारे कृषी पर्यवेक्षक माजलगाव यांनी माणले.

## आ.क्षीरसागरांनी घेतली जलसंधारण, जलसंपदा, जलजीवन व पाटबंधारे विभागाची बैठक

**प्रलंबित असलेली कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना**

बीड । प्रतिनिधी

बीड मतदारसंघात जलसंधारण, जलसंपदा, जलजीवन मिशन विभागाशी संबंधित कामांच्या बाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी सदरील विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विविध सूचना दिल्या. तसेच फुलसांगवी येथील आंदोलनच्या अनुषंगाने जिल्हा जलसंधारण अधिकारी व जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांना निर्देश दिले.



बीड मतदारसंघातील अनेक गावांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत कामे सुरू आहेत. परंतु ही कामे अनेक ठिकाणी प्रलंबित आहेत. तसेच मतदारसंघात जलसंधारण, जलसंपदा विभाग यांच्याशी संबंधित नागरीकांच्या काही अडचणी आणि मागण्या होत्या याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२४) रोजी बीडमध्ये शासकीय विश्रामगृह येथे जलसंधारण, जलसंपदा, पाटबंधारे विभाग, जलजीवन मिशन, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. यावेळी नागरिकांच्या समोरच अधिकार्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. यासोबतच बीड मतदारसंघ क्षेत्रात शिरूर-कासार तालुक्यातील फुलसांगवी व इतर गावातील ग्रामस्थांचे काही दिवसांपूर्वी जलसंधारण विभागाशी संबंधित कामांच्या अनुषंगाने आंदोलन सुरू होते. या आंदोलनातील मागण्या मार्गी लावण्यासाठी आ.क्षीरसागर यांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी व जायकवाडी पाटबंधारे प्रकल्प कार्यकारी अभियंता तसेच पाटबंधारे विभागाचे अधिकारी यांना सूचना दिल्या. या बैठकीसाठी संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी व संबंधित नागरिक, शेतकरी बांधव उपस्थित होते.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात राज्यस्तरीय वाद विवाद स्पर्धा संपन्न

**नवीन धोरण ठरवताना चर्चा घडवून आणणे स्तुत्य उपक्रम: आ.प्रकाश सोळंके**

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दि २३ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत संभाजीनगर सह अनेक महाविद्यालयाने सहभाग घेतला.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयात सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त नवीन शैक्षणिक धोरणाने उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारेल का/ नाही या विषयावर राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेच्या उद्घाटनपर कार्यक्रमाचे अध्यक्ष म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके होते.तर स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड.भानुदासराव डक




यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. जी.के. सानप,उपप्राचार्य डॉ.एम. ए.कव्हळे, उपप्राचार्य डॉ. एन.के. मुळे,प्रा.बालाजी बोडके,प्रशांत चव्हाण, सतीश एरंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. प्रकाश सोळंके म्हणाले की, एखादे नविन धोरण ठरवत असताना त्याविषयी समाजात चर्चा घडवून आणणे हे महत्त्वाचे आहे. त्या दृष्टिकोनातून सुंदरराव सोळंके महाविद्यालयात नवीन राष्ट्रीय धोरणाविषयी स्पर्धेच्या माध्यमातून चर्चा घडवून आणली जात आहे हे स्तुत्य आहे .

राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर सह अन्य जिल्ह्यातून स्पर्धक सहभागी झाले. यामध्ये माणिकचंद पहाडी विधी महाविद्यालय संभाजीनगर (प्रथम), श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव( द्वितीय), तर राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर (तृतीय ) या महाविद्यालयाने पारितोषिक पटकावले.स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. रामहरी मायकर, डॉ.रिंगणे, प्रा. भरत खेत्री यांनी केले. प्रस्ताविक प्राचार्य डॉ. जी.के. सानप यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.ज्ञानेश्वर कुंडकर यांनी केले तर आभार प्रा. बालाजी बोडके यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा डॉ ज्ञानेश्वर शिंदे,प्रा.डॉ. गणेश मोकासरे,प्रा.डॉ.अरुण पेंटावार,प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा. प्रकाश शिंदे, प्रा.सिद्धेश्वर कदम यांनी परिश्रम घेतले.